क्रमांक :१०१

## महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२१ / अग्रहायण २२, १९४३ (शके)**

**१०१. :: म.वि.स. नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.स. नियम २९३ अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा करण्याबाबतचे प्रस्ताव ::**

१) महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२१ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात म.वि.स. नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.स. नियम २९३ अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा करण्याबाबतचे प्रस्ताव **DMOIS** या आज्ञावली **(WEB PORTAL)** व्दारे ऑनलाईन **(Online)** पध्दतीने स्विकारण्यात येतील. तसेच ज्या दिवशी प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात येणार आहे त्याच्या आदल्या कामकाजाच्या पूर्ण दिवस अगोदर तो प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने **(Online)** सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येईल. त्याचप्रमाणे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालयात ऑफलाईन **(Offline)** पध्दतीने देखील स्वीकरण्यात येतील.

२) म.वि.स. नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.स. नियम २९३ अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर ऑफलाईन **(Offline)** पध्दतीने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांमध्ये एका पेक्षा जास्त सदस्य असल्यास त्या सदस्यांच्या स्वाक्षरीच्या खाली सदस्यांनी आपले नाव व नावांचा क्रम स्पष्टपणे नमूद करावा.

३) म.वि.स. नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.स. नियम २९३ अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाच्या सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत प्रस्ताव चर्चेला घेणेसंबंधीचा संपूर्ण अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा राहील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १३ डिसेंबर, २०२१

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) मा उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३). मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
६) संगणक कक्ष (WEBSITE)
७) एम.के.सी.एल.